॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र. कबचौउमवि/१४/विवि / 201 /२०२४ दि. ०९/०९/२०२४

**प्रति,**

१) मा. प्राचार्य/ संचालक, कबचौउमविशी संलग्नीत महाविद्यालये, मान्यता प्राप्त परिसंस्था.

२) मा. संचालक/ विभागप्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा-विभाग

**विषय :- महाराष्ट्रातील सर्व शाळा, विद्यापीठ व उच्च व तंत्र शिक्षण संस्थेमध्ये मुलींना तीन महीन्यांचा कराटे प्रशिक्षण कार्यक्रम तात्काळ आयोजित करणेबाबतच्या परिपत्रकाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेबाबत..**

**संदर्भ :- शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. उशिसं/ मवि-१/ महिला धोरण/२०२४ दि.**

महोदय,

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्र प्राप्त झाले असून सदर पत्रात महिला धोरण २०१४ मधील मुद्दा क्र. ६.१३ अन्वये **सर्व शिक्षण संस्थांनी मुलींसाठी तीन महीन्यांचा कराटे प्रशिक्षण कार्यक्रम किमान एकदा राबविणे** असे सूचित केल्याचे कळविले आहे.

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयस्तरावर कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

10.9.2024

(डॉ. जयेंद्र दि. लेकुरवाळे)

**संचालक, विद्यार्थी विकास**

**प्रत -**

१) विभागप्रमुख, मा.कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव

२) विभागप्रमुख, मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव

३) विभागप्रमुख, मा.कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव

४) जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव

D/Shivade/General letter

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),**
**४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर ४११०१६.**
**Web :** www.dhepune .gov. in **E-Mail :mavi.** dhepune@gov.in
**फोन नं.**020/26122119,26051512,26130627,26124639 **फॅक्स नं.** 020/26111153.

क्र.: उशिसं/मवि-१/महिला धोरण /२०२४/ दिनांक: .२०२४

प्रति,
१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.
२. कुलसचिव, सर्व अकृषी/अभिमत/स्वयं अर्थसहायित विद्यापीठे.

**विषय : महाराष्ट्रातील सर्व शाळा, विद्यापीठ व उच्च व तंत्र शिक्षण संस्थेमध्ये मुलींना तीन महिण्यांचा कराटे प्रशिक्षण कार्यक्रम तात्काळ आयोजित करणेबाबतच्या परिपत्रकाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेबाबत..**

संदर्भ: १. श्री. अमर अनिता जालिंदर एकाड, संस्थापक, दीपू फाऊंडेशन यांचे पत्र दि. ३०.८.२०२४
२. संचालनालयाचे परिपत्रक क्र.: उशिसं/मवि-१/महिला धोरण/२०२४/१३०२ दि. २२.२.२०२४

संदर्भांकित पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महिला धोरण २०१४ मधील मुद्दा क्र. ६.१३ अन्वये "सर्व शिक्षण संस्थांनी मुलींसाठी तीन महिन्यांचा कराटे प्रशिक्षण कार्यक्रम किमान एकदा राबविणे." सूचित करण्यात आले आहे.

उपरोक्त सूचनेनूसार कार्यवाही करणेबाबत, आपल्या स्तरावरुन सर्व संलग्नित महाविद्यालयांना विनाविलंब कळविण्याबाबत तसेच विद्यापीठांना विद्यापीठ स्तरावर उपरोक्त सूचनेची अंमलबजावणी करण्याबाबत संदर्भ क्र. २ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

संचालनालयाचे पत्र दि. २२.२.२०२४ च्या अनुषंगाने पुढीलपैकी योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. -

१. विभागीय सहसंचालक कार्यालयांच्या/विद्यापीठांच्या स्तरावरुन करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ संचालनालयास सादर करावा.
२. ज्या विभागीय सहसंचालक कार्यालयांकडून/विद्यापीठांकडून अद्याप कार्यवाही झालेली नाही त्यांनी तात्काळ कार्यवाही करुन त्याबाबचा अहवाल संचालनालयास सादर करावा.
३. विभागीय सहसंचालक कार्यालयांनी/विद्यापीठांनी सूचना दिल्यानंतर महाविद्यालयांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आपल्या स्तरावर संकलित करुन एकत्रित स्वरुपात संचालनालयास सादर करावा तसेच ज्या महाविद्यालयांनी अद्याप आपल्या निर्देशानूसार कार्यवाही केली नसेल अशा महाविद्यालयांबाबत आपल्या स्तरावरुन करण्यात येत असलेल्या कारवाईबाबत संचालनालयास अहवाल सादर करावा.

उपरोक्तपैकी जी कार्यवाही करण्यात आली असेल/करण्यात येत आहे त्याबाबतचा अहवाल संचालनालयाच्या mavi.dhepune@gov.in या ई-मेल आय.डी. वर तात्काळ सादर करावा.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 05-09-2024 15:59:48

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
शिक्षण संचालक
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११०१६.